# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 12/09/2023 (मंगळवार) दुपार

---

### काटोल येथील जबरी चोरीच्या गुन्हयातील फिर्यादी निघाला चोर
### आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

दिनांक ०९/०९/२०२३ रोजी घुबडमेट टेकडी काटोल येथे फिर्यादी शब्बीर इस्माईल मोहम्मद हा एकटाच लसुण भरून एच आर ५५ ए. एल– ८३०६ ने चालवत वडचिचोली मार्ग ते काटोल मार्ग जात असता वडचीचोली समोर काळया रंगाच्या पॅशन मोटरसायकलवर ०३ अनोळखी इसमांनी फिर्यादीला चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीकडुन नगदी १३,०००/— रू. लुटले व तीघांनीही फिर्यादिला दोरीने बांधुन झुडपात फेकुण दिले व थोडया वेळाने मालवाहु गाडीत लसुनचे १०२ बोरे भरून नेले. फिर्यादिचे असा एकुण ६,७६,०००/— रू चा माल लुटुन तिन्ही आरोनी पळुण गेले. हया गंभीर घटनेबाबत पोलीस स्टेशन काटोल येथे ०३ अनोळखी इसमांविरुध्द गुन्हे रजि. नं. १०८२/२०२३ कलम ३९२, ४२७, ३४ भा.द.वी. अन्वये जबरी चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपास मा. पोलीस अधीक्षक सा. नागपूर ग्रामीण यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथून करण्यात आला. तपासा दरम्यान सदर प्रकरणातील फिर्यादी शब्बीर **मोहमद इस्माईल मोहमद वय ५० वर्ष, रा. ग्राम आलोद. जि. बुंदी (राजस्थान)** यास गुन्हयासंबंधाने सखोल विचारपूस केली असता त्याने दिशाभूल करणारी माहिती देऊन उडवाउडवीचे उत्तरे दिले. त्यावरून त्यांचेवर संशय बळावला असता त्यास विश्वासात घेऊन सखोल विचारपूस केली असता त्याने नमूद गुन्हा त्याचा साथीदार **पवन मदनलाल मेवाडा वय २३ वर्ष रा. कोटा (राजस्थान)** याच्या मदतीने केला असल्याची माहिती दिल्याने गुन्ह्याची उकल करण्यात आली. यावरून सदर गुन्हा फिर्यादीने घडवून आणल्याचे समोर आल्याने नमूद गुन्ह्यात शब्बीर मोहमद इस्माईल मोहम्मद याला आरोपी करून त्याब्यात घेतले. सदर आरोपीने गुन्ह्यात चोरी केलेला मुद्देमाल लसूण ठेऊन असलेले प्रत्येकी पन्नास किलो वजनाचे एकूण १०० कट्टे हे पवन मेवाडा यांचेजवळ कोटा राजस्थान येथे ठेवल्याची माहिती दिली. आरोपी शब्बीर मोहमद हा पवन मेवाडा यांचेकडे घेऊन गेला असता पवन मेवाडा यास त्याचे नाव पत्ता विचारून त्याची ओळख पटविली असता त्याने आपले पवन उर्फ गौरव मदनलाल मेवाडा वय २३ वर्ष रा. डोकंम श्रीराम नगर रामदेव मंदिर जवळ RSS ग्राउंड त. जि. कोटा (राजस्थान) असे सांगितले त्यावर त्यास गुन्ह्याची माहिती देऊन गुन्ह्यामध्ये चोरी गेलेल्या मालाबाबत विचारपूस केली असता पवन मेवाडा याने त्याचे जवळील असलेला आयसर ट्रक क्र. HR-५५ AM-5192 मध्ये पन्नास किलो वजनाचे एकूण १०० कट्टे (पोते ) लसूण ठेवल्याची माहिती दिली तसेच त्याने पुढे असे सांगितले कि दि. ०७/०९/२०२३ रोजी मोहम्मद शब्बीर याचे माझ्या मोबाईलवर कॉल करून त्याचा तीनधार जि. जळावर येथे लसूण घेऊन जाण्याकरिता ट्रक घेऊन येण्यास सांगितले. आरोपी शब्बीर याचे सांगण्यावरून पवन याने तीनधार या गावी आयसर ट्रक क्र HR55 AM 5192 घेऊन गेला व सदर ट्रक आयसर ट्रक क्र HR 55 ए. एल. -8306 मधील ५० किलो वजनाचे एकूण १०० कट्टे (पोते) कोटा येथे घेऊन आल्याची माहिती दिली त्यावरून पवन मेवाडा यास आयसर ट्रक क्र. HR 55 AM 5192 मधील मुद्देमाल १) ५० किलो वजनाचे एकूण १०० कट्टे (पोते) किंमती १३० रुपये प्रति किलो एकूण वजन ५००० हजार किलो ग्रॅम लसूण असा एकूण किंमती ६,५००००/— रु, (२) आयसर ट्रक क्र. HR 55 AM 5192 अंदाजे किंमती २०,००,०००/—रु. असा एकूण किंमती २६,५०,०००/— रुपयाचा

मुद्देमालासह ताब्यात घेवुन दोन्ही आरोपीतांना पुढील कायदेशीर कारवाईकामी पोस्टे काटोल यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष ए. पोद्दार साहेब (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, API आशिषसिंह ठाकूर, PSI आशिष मोरखडे, ASI चंद्रशेखर घडेकर, HC निलेश बर्वे, मयूर ढेकले, प्रमोद तभाने, रणजित जाधव, चालक आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.

## खुनाचा प्रयत्न

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०१ किंमी अंतरावर मौजा वार्ड क्र. ०४ इंदिरानगर आबादी खापरखेडा येथे दिनांक ११/०९/२०२३ चे १३/०० वा. ते १३/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुधीर रज्जू इंगळे, वय ३३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४ इंदिरानगर आबादी खापरखेडा यांचे कुटुंबातील सदस्यावर पोलिसांकडे मुखबिरी करित असल्याचा आरोप करून व त्या संबंधाने फिर्यादीच्या पत्नीने दादा तेलंगे, बुध्दु तेलंगे विरुद्ध दिलेल्या रिपोर्टच्या बदला घेण्यासाठी यातील आरोपी क्र. १) देवदत्त उर्फ दादू राजू राव तेलंगे वय ३१ वर्ष, २) देवधन उर्फ बुध्दु राजूराव तेलंगे वय ३० वर्ष, त्यांच्यासोबत आरोपी क्र. ३) रितिक सुरेश दुपारे वय २३ वर्ष, ४) गण्या उर्फ गणेश रामदास सहारे वय २० वर्ष, ५) रुपेश फाटा सर्व रा. वार्ड क्र ०४ खापरखेडा. तसेच दादा तेलंगे यांचे जरीपटका येथील नातेवाईक आरोपी क्र. ६) अरुण आवळे, ७) दर्शन बोरकर, ८) राहुल अन्नेवार, सर्व रा. जरीपटका नागपूर. व इतर असे यांना चार मोटरसायकलवर घेऊन फिर्यादी व फिर्यादीच्या परिवारातील लोकांना जिवे मारण्याच्या उद्देशाने हातात बंदूक, तलवार, लाठया, शॉकअप घेऊन आले तलवारी लाठयांनी फिर्यादीचे घराची तोडफोड करून फिर्यादीचे घरातील लोकांना विटा मारून जखमी केले व फिर्यादीची मामे बहीण स्नेहा हिचेवर बंदुकीने फायर करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम १४७, १४८, १४९, ३०७, ३३६, ३३७, ४२७, ५०६ भादवी. सहकलम ३/२५, ४/२५ आर्म ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. अनिल राऊत सा. पोलीस स्टेशन खापरखेडा मो. नं. ९४२२६१४६३३ हे करीत आहे.

## मोबाईल चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०.५ कि. मी. अंतरावरील शास्त्री चौक काटोल येथे दिनांक ०४/०९/२०२३ चे ०२.३० वा. ते ०३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— पीयुश दिलीप घारड, वय ३० वर्ष रा. घोडे प्लाट साईमंदीर जवळ काटोल यांचे शिवभोजनालय व डेलीनिड्सचे दुकान असुन फिर्यादी यांनी नेहमी प्रमाणे आपले दुकान उघडुन ग्राहकांना जेवन वाढुन कॉउंटर जवळ बसले तेव्हा त्यांचे जवळ असलेला विवो वाय २१ कंपनीचा मोबाईल ठेवला होता व डेलीनिड्स या दुकानात त्याच वेळी ग्राहक आल्याने फिर्यादी हे त्या ग्राहकाकडे गेले तेव्हा दोन्ही अनोळखी इसम हे जेवण करीत होते व त्याचे जेवण झाल्यावर त्यापैकी एकाने फिर्यादीच्या मोबाईलवर २०/— रू. फोनपे केले व कॉउंटरवर ठेवलेला विवो वाय २१ कंपनीचा मोबाईल किंमती १४०००/— रू चा घेवुन गेले नंतर फिर्यादीने सिसिटीव्ही फुटेज चेक केले असता त्यामध्ये निळे रंगाचा शर्ट घातलेल्या अज्ञात ईसमाने फिर्यादीचा कॉउंटरवर ठेवलेला मोबाईल खिशात घालुन चोरून घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पवन वाघमारे ब. नं. ५५० मो. नं. ९८३४२८१४०१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**